महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील बदलीबाबत..
डॉ.डी.के.परदेशी

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः न्यायप्र-३०१७/प्र.क्र.१९८/सेवा-२

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, १० मजला,
मंत्रालय,मुंबई
तारीख: ११ ऑक्टोबर,२०१७

वाचा -

१) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश क्रमांकः बदली-२०१७/प्र.क्र.१२३/सेवा-२, दि.५.८.२०१७
२) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे दि.२२.८.२०१७ चे आदेश

शासन आदेश -

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१००+ग्रेडवेतन रु. ६६००) मधील जिल्हा शल्य चिकित्सक या संवर्गातील डॉ. डी. के. परदेशी, वैद्यकीय अधिक्षक यांची बदली दि.५.८.२०१७ च्या आदेशान्वये ग्रामीण रुग्णालय गगनबावडा, कोल्हापूर येथून ग्रामीण रुग्णालय, धडगांव, जि. नंदूरबार येथे करण्यात आली होती. सदर बदली आदेशा विरुध्द डॉ. डी. के. परदेशी यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. ७७२/२०१७ दाखल केला असून, मा. न्यायाधिकरणाने दि. २२.८.२०१७ रोजी डॉ. डी. के. परदेशी यांची बदली ज्या ठिकाणहून झाली होती त्या ठिकाणी पुन्हा पदस्थापना देण्याबाबत आदेशित केले आहे. मा. न्यायाधिकरणाच्या सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल करण्याच्या अधिन राहून डॉ. डी. के. परदेशी यांची वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, धडगांव, जि. नंदूरबार येथे झालेली बदली रद्द करुन त्यांची वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, गगनबावडा, कोल्हापूर येथे पुन्हा पदस्थापना करण्यात येत आहे.

२. सदर आदेश महाराष्ट्र कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. संबंधितांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे तसेच त्यानी रुजू अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व शासनास सादर करावा.

४. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०११२५१३०९११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: CN = Vishnudas Pundlikrao Ghodke, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.10.11 16:47:57 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक आरोग्य सेवा, मुंबई
३) उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मडळ कोल्हापूर
४) उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक
५) जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर/नंदूरबार
६) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, नंदूरबार / कोल्हापूर
८) मा.मंत्री (सा.आ.) / मा.राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव
९) मा.प्रधान सचिव (सा.आ.) यांचे स्वीय सहायक
१०) डॉ. डी. के. परदेशी, वैद्यकीय अधिक्षक यांना (संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे मार्फत)
११) निवडनस्ती (सेवा-२)